## <u>आदेश आयोग नेमणूक अर्ज नि.क्र.४१ वर</u>

(पारीत केल्याचा दिनांक **१४.०२.२०१८**)

**०१)** प्रस्तुत अर्ज वादीने **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ०९</u>** नुसार अतिक्रमण दूर करणे व ताकीदीच्या दाव्यात मा. उप अधिक्षक, भूमि अभिलेख, रोहा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे पुई येथील गट क्रमांक २६, क्षेत्र हेक्टर ०.३४.०० आर. ची मोजणी करून अहवाल दाखल करण्यासाठी नेमणूक होण्यासाठी केला आहे.

**०२)** वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींनी वाद मिळकतीत अतिक्रमण केले आहे. दावा मिळकतीची वस्तुस्थिती न्यायालयासमोर दाखल करण्यासाठी वादीने न्यायालयीन आयुक्त आयोग नेमण्याची विनंती केली.

**०३)** प्रतिवादी क्रमांक ०२ ने अर्जाला म्हणणे **<u>नि.क्र.४३</u>** दाखल केले. प्रतिवादी क्रमांक ०१ तर्फे विधीज्ञांनी पुरसीस **<u>नि.क्र.४५</u>** दाखल करुन प्रतिवादी क्रमांक ०२ ने दाखल म्हणणे स्विकारले. प्रतिवादींनी वाद मिळकत मोजणी करण्यास हरकत घेतली.

**०४)** वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एन्. जी. देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला.

**०५)** वादीतर्फे विधीज्ञ श्री. सावंत यांनी असा युक्तीवाद केला की, वाद मिळकत वादीची मालकी व कब्जा वहिवाटीची आहे. प्रतिवादींनी वाद मिळकतीमध्ये अतिक्रमण होईल असे अतिक्रमीत बांधकाम केले आहे.

**०६)** प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. देशमुख यांनी असा युक्तीवाद केला की, वादीचा अर्ज कायदेशीर नाही. वादीने पुरावा गोळा करण्यासाठी व प्रतिवादींवर दबाव टाकण्यासाठी अर्ज केला आहे. वादी स्वच्छ हाताने न्यायालयात आला नाही.

**०७)** अतिक्रमण दूर करून ताबा मिळण्याच्या दाव्यामध्ये उभयतांना मान्य असलेला नकाशा किंवा आयोगाचा अहवाल व नकाशा अटळ आहे. वादीने प्रतिवादींनी बांधकाम करुन अतिक्रमण केले आहे असे कथन केले आहे याउलट प्रतिवादींनी ते नाकारले आहे. म्हणून तज्ञाची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करून वाद मिळकतीची मोजणी करुन नकाशा व अहवाल प्राप्त केल्याशिवाय अतिक्रमण झाले आहे किंवा नाही हे अभिलेखावर येणार नाही. म्हणून उप-अधिक्षक भूमी अभिलेख, रोहा यांची न्यायालयीन आयुक्त अशी नेमणूक वादीने आयोगाचा खर्च देण्याच्या अटीवर वादाचे पुर्ण निराकरण करण्यासाठी अहवाल व नकाशा दाखल करण्यासाठी करणे न्यायाचे होईल.

**०८)** वादी व प्रतिवादींना ते ज्या महसूल किंवा ईतर कागदपत्रांवर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या दोन प्रमाणीत / सत्य प्रती एक न्यायालयासाठी व एक न्यायालयीन आयुक्ताला तसेच एक छायांकीत प्रत विरुद्ध पक्षकाराला देण्यासाठी दाखल करण्याचा आदेश देणे उचित होईल. म्हणून खालील आदेश पारीत करणे न्यायाचे होईल.

## <u>आ दे श</u>

**०१**. वादीचा अर्ज **<u>नि.क्र.४१</u>** मंजूर करण्यात येतो.

०२. ***दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ०९ सह वाचनीय कलम ७५(ब)*** नुसार उप-अधिक्षक भूमि अभिलेख रोहा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे पुई येथील गट क्रमांक २६, क्षेत्र हेक्टर ०.३४.०० आर. चे निरीक्षण करून आयोगपत्र मिळाल्यापासून दोन महिन्याच्या आत अतिक्रमण नकाशा काढून नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी नेमणूक करण्यात येते.

**०३**. वादीने उप-अधिक्षक भूमि अभिलेख, रोहा यांच्या कार्यालयात त्यांच्या सुचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयोगपत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्य प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**०४**. वादी व प्रतिवादींना ते ज्या महसूल किंवा ईतर कागदपत्रांवर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या दोन प्रमाणीत / सत्य प्रती व एक छायांकीत प्रत विरुद्ध पक्षकाराला देण्यासाठी अभिलेखावर दाखल करण्याचे निर्देशीत करण्यात येते.

**०५**. न्यायालयीन आयुक्ताला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ७५ ते ७८, क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी नियमावलीतील प्रकरण क्रमांक ०८ परिच्छेद क्रमांक १५१ ते १७० व महसूल नियमावलीतील आवश्यक नियमांचा अवलंब करून आयोगाचे कार्य सत्वर पुर्ण करण्याचे व मोजणी नकाशा व अहवाल त्वरीत न्यायालयात दाखल करण्याचे निर्देशीत करण्यात येते.

**०६**. आयोगाचे काम काही अपरिहार्य कारणामुळे उपरोक्त ठरवून दिलेल्या मुदतीत पुर्ण होवू शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापुर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करून मुदत वाढ मागु शकतात.

**०७**. उभय पक्षांना जातीने अथवा वकीलांमार्फत न्यायालयीन आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशीत करण्यात येते.

**०८**. न्यायालयीन आयुक्ताला उभय पक्षांना आयोगाच्या ठरलेल्या दिवस, तारीख व वेळेची सुचना वादपत्राच्या सरनाम्यातील पत्त्यांवर नोटीसा काढून कळवण्याबाबत निर्देशीत करण्यात येते.

**०९**. न्यायालयीन आयुक्ताला आयोगाचे स्वरूप व हेतूचे आकलन होण्यासाठी वादपत्र व कैफियतीच्या प्रमाणीत प्रती देण्याचे वादीला निर्देशीत करण्यात येते.

**१०**. जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी, तारखेला व वेळी कोणताही पक्ष गैरहजर राहिल्यास न्यायालयीन आयुक्ताने तसा पंचनामा करून आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारासमक्ष पुर्ण करावे.

**११**. वादीने आदेश कलम ०३, ०४ व ०९ ची पुर्तता तात्काळ करावी.

**१२**. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**

**(सुभाष लक्ष्मण फुले)**
**(एम्. एच्. आर. जी. ०००९-२१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**स्थळ : रोहा.**
**दिनांक : १४.०२.२०१८.**